# सातारा जिल्हा परिषद ,सातारा

## ग्रामपंचायत विभाग




# Shift to a Cashless Society using digital financial tools.

# (रोकड रहित महाराष्ट्र - सातारा )

## प्रस्तावना:

प्रामुख्याने ग्रामीण भागातील जनतेमध्ये असलेली डिजिटल आर्थिक साक्षरतेची कमतरता हे एक देशापुढील महत्त्वाचे आव्हान आहे आणी केंद्र शासनाने नुकत्याच लागू केलेल्या विमुद्रीकरण प्रसंगी व भारताला रोकडविरहित आर्थिक देश बनविण्याच्या आराखडयांच्या बाबतीत ही कमतरता प्रकर्षाने दिसून आल्याने डिजिटल आर्थिक सेवांच्या बाबतीत नागरीकांमध्ये आणी त्यातही ग्रामीण व निम-शहरी भागांमध्ये ही जाणीव निर्माण करणे व त्याचबरोबर डिजिटल सेवांसंदर्भातील पर्यायांबाबतीत सक्षम बनविणे/सहाय्य करणे ही तातडीची गरज आहे.

पुढे चालु...

ग्रामीण भागातील नागरीकांना इलेक्ट्रॉनिक पेमेंट सिस्टीम ची सोय उपलब्ध करुन देऊन त्याचा वापर करण्यासाठी नागरीकांना सक्षम करणे,पंचायत स्तरावर व्यापा-यांनी ईपीएस चा वापर करावा यासाठी त्यांना उत्तेजना देणे आणी सक्षम करणे तसेच ग्रामीण भागामध्ये जाणीव-जागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.





















# डिजीटल आर्थिक सेवा व साधने

## (नोटाविरहित व्यवहार)

# चलनविरहित व्यवहारांसाठी डिजीटल माध्यमे




यु.पी.आय.




यु.एस.एस.डी



बँक कार्डस




ए.ई.पी.एस.







ई-बटवा

# लोकांकडे असलेल्या संसाधनांच्या उपलब्धतेनुसार किंवा सज्जतेनुसार सर्व प्रकारच्या लोकसंख्येकरिता डिजीटल व्यवहाराचे उपलब्ध प्रकार व पर्याय

| अ.नं. | लोकांकडील उपलब्धता/सज्जता | डिजीटल व्यवहारासाठी उपलब्ध पर्याय |
|---|---|---|
| १ | बँक खातेही नाही व मोबाईल फोनही नाही | जन-धन खाते उघडून बँकेकडून आर्थिक व्यवहारांसाठी रुपे,डेबिट किंवा प्रिपेड कार्ड प्राप्त करुन घ्यावे. |
| २ | बँक खाते आहे परंतु मोबाईल फोन नाही | आधार क्रमांक आधारित देयक प्रणालीचा वापर तसेच बँकेकडून आर्थिक व्यवहारांसाठी रुपे,डेबिट किंवा प्रिपेड कार्ड प्राप्त करुन घ्यावे व स्वाईप करुन सर्व आर्थिक व्यवहारांसाठी वापरावे. |
| ३ | बँक खाते आहे व साधा/फिचर मोबाईल फोन आहे. | एस.एम.एस.व्दारे व्यवहार,जिथे पी.ओ.एस. उपलब्ध आहे तिथे रुपे,डेबिट कार्डचा वापर करावा व जिथे पी.ओ.एस. उपलब्ध नाही तिथे यु.एस.एस.डी. या पर्यायाचा वापर करावा. |
| ४ | बँक खाते आहे व स्मार्ट मोबाईल फोन आहे. | यु.पी.आय.व्दारे बँक खात्यातून व्यवहार,रुपे कार्ड,डेबिट कार्डचा जिथे पी.ओ.एस. उपलब्ध आहे तिथे व मोबाईल बटव्यासाठी वापर करावा. |

# बँक कार्डस्चे प्रकार



प्रिपेड कार्डस्

डेबिट कार्डस्

क्रेडीट कार्डस्

# प्रिपेड कार्डस्







- ग्राहकाच्या बँक खात्यामधील शिल्लकेतून विनंतीनुसार प्रि-लोडेड केले जाते.
- मर्यादित रक्कमेच्या व्यवहारासाठी वापरता येते.
- मोबाईल रिचार्ज सारखे पुन्हा रिचार्ज किंवा प्रि-लोड करता येते.
- वापरण्यासाठी सुरक्षित.

# डेबिट कार्डस्







- ग्राहकाचे ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेमार्फत दिले जाते.(चालु,बचत किंवा ओव्हरड्राफ्ट)
- कार्डव्दारे करण्यात आलेला खर्च त्वरीत ग्राहकाच्या खात्यावर नोंदला जातो.
- बँकेने निर्धारित केलेल्या रक्कमे एवढी रक्कम ए.टी.एम.मधून काढण्यासाठी वापरता येते.
- ग्राहकाच्या बँक खात्यात जेवढी रक्कम शिल्लक आहे त्या मर्यादेपर्यंतच खातेदार या कार्डचा वापर करुन रोख पैसे काढू शकतो.
- देशातंर्गत एका व्यक्तीच्या खात्यावरुन दुस-या व्यक्तीच्या खात्यावर पैसे पाठवण्यासाठी वापरता येते.

# क्रेडिट कार्डस्







- ग्राहकाचे ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेमार्फत दिले जाते. (रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत मान्यतेने)
- या,कार्डव्दारे करण्यात आलेला खर्च/व्यवहार त्वरीत ग्राहकाच्या खात्यावर नोंदला जातो.
- ग्राहकाच्या खात्यावरील शिल्लक रक्कमेपेक्षा बँकेने निर्धारित केलेल्या रक्कमे एवढी रक्कम काढण्यासाठी वापरता येते.तथापी यावर बँकेमार्फत व्याज आकारणी केली जाते शिवाय ही जास्तीची रक्कम विहित मुदतीत बँकेस परत करणे आवश्यक.
- देशातंर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर वापरता येते.

# रोकडविरहित व्यवहारांसाठी कार्डस्‌चा वापर कसा केला जाऊ शकतो

- कोठेही खरेदीसाठी तुम्ही ही कार्डस् वापरु शकता.
- दुकानांची बिले देण्यासाठी, ऑनलाईन खरेदीसाठी, ATM, Micro ATMs, Wallets या ठिकाणी या कार्डस्‌चा वापर करता येतो.
- ATM मधून पैसे काढण्यासाठी, विक्री केंद्रांच्या ठिकाणाहून वस्तू खरेदीसाठी आणी सेवा प्राप्त करुन घेणेसाठी.
- सर्व प्रकारच्या अत्यावश्यक सेवांची बिले भागविण्यासाठी.
- रेल्वे/विमान/बस तिकिटांचे बुकिंग करण्यासाठी,हॉटेल बुकिंगसाठी तसेच उपाहारगृहांची बिले भागविण्यासाठी.
- POS Machine/Card reader उपलब्ध असलेल्या ठिकाणी कोठेही व कोणत्याही प्राप्त करुन घेतलेल्या सेवांची देणी भागविण्यासाठी.

# यु.एस.एस.डी.

## Unstructured Supplementary Service Data

देशातील प्रत्येक सर्वसामान्य नागरीकाला बँकिंग सेवा उपलब्ध करणे हा मुख्य उद्देश. प्रत्येक ग्राहकास दुरध्वनी/भ्रमणध्वनी सेवा पुरवठादारांच्या विभाग व मोबाईल क्रमांकाव्यतिरीक्त फक्त ***99#** या एकल क्रमांकाव्दारे प्रतिदिन रु.५०००/-पर्यंतचे आर्थिक व्यवहार करता येतात.

## यु.एस.एस.डी.साठी आवश्यक बाबी

- बँक खाते असणे आवश्यक
- जी.एस.एम. प्रकारचे नेटवर्क असलेला मोबाईल फोन असणे आवश्यक
- ग्राहकाने आपला मोबाईल क्रमांक बँक खात्याशी जोडलेला/नोंदणी केलेला असणे आवश्यक
- बँकेकडून ग्राहकाने मोबाईल मनी आयडेंटीफायर (MMID) व मोबाईल पीन (MPIN) प्राप्त करुन घेणे आवश्यक.

# यु.एस.एस.डी.चा वापर करण्याची पध्दत
## Unstructured Supplementary Service Data

- तुमचा मोबाईल क्रमांक बँक खात्याशी जोडा (लिंक करा)
- मोबाईल फोन वरुन ***99#** हा क्रमांक डायल करा
- तुमच्या बँकेच्या नावाची पहिली ३ आद्याक्षरे किंवा IFSC कोड मधील पहिली ४ अक्षरे भरा.
- **Fund Transfer-(MMID)** हा पर्याय निवडा
- ज्याला पैसे दयावयाचे आहेत त्याचा मोबाईल क्रमांक व MMID प्रविष्ट करा
- जी रक्कम दयावयाची आहे ती भरा व MPIN प्रविष्ट करा काही अंतर सोडून तुमच्या बँक खाते क्रमांकाचे शेवटचे ४ क्रमांक प्रविष्ट करा व ओ.के.करा.
- शिल्लकेची चौकशी,Mini Statement, MMID संबंधित माहिती व M-PIN बदलणे या सारख्या सुविधा उपलब्ध आहेत.

# ए.ई.पी.एस. आधार क्रमांक आधारीत देयक प्रणाली
# Aadhar Enabled Payment System




बँक,बँकिंग करस्पाँडंट किंवा ग्रामपातळीवरील व्ही.एल.ई.च्या मदतीने आधार क्रमांक आधारीत देयक प्रणाली सेवा उपलब्ध करणे हा मुख्य उद्देश. याव्दारे प्रत्येक ग्राहक अनेक वेळा बँक ते बँक आर्थिक देवाण-घेवाण कोणत्याही ए.ई.पी.एस.उपलब्ध ठिकाणी व स्वस्त धान्य दुकानातुनची खरेदी परवलीच्या शब्दाशिवाय करु शकतात.

## ए.ई.पी.एस.आधार क्रमांक आधारीत देयक प्रणाली वापराची पध्दत

- बँकिंग करस्पाँडंट किंवा **Micro ATM/POS** असलेल्या ठिकाणी जा.
- तुमच्या बँकेचे नाव व आधार क्रमांकाची माहिती दया.
- कोणत्या प्रकारचा व्यवहार करावयाचा आहे त्याचा पर्याय निवडा.
- स्कॅनर वरती बोटाचा ठसा स्कॅन करा
- व्यवहाराच्या यशस्वीतेची पावती घ्या.
- उपलब्ध सुविधा- बँक खात्याच्या शिलकेचा तपशिल,खात्यातून पैसे काढणे, पैसे भरणे,आधार ते आधार निधी हस्तांतरण व ए.ई.पी.एस.उपलब्ध असलेल्या ठिकाणच्या स्वस्त धान्य दुकानातील खरेदी.

# ए.ई.पी.एस. आधार क्रमांक आधारीत देयक प्रणालीचे फायदे
# Aadhar Enabled Payment System

- वापरण्यास सोपे व सुरक्षित – व्यक्तीच्या जनसांख्यिकीय व जनुकीय माहितीवर आधारीत.
- आधार क्रमांक व बोटांच्या ठशाव्दारे संरक्षित आर्थिक देवाण-घेवाण.
- राज्य व केंद्र शासनाकडून प्रदान होणा-या लाभार्थ्यांसाठी उपयुक्त उदा.नरेगा, दिव्यांगासाठीच्या निवृत्तीवेतन योजना इत्यादी ज्यासाठी आधार क्रमांक प्रमाणभूत मानला जातो.
- बँका नसलेल्या ठिकाणी व जिथे ग्राहक बँकेपर्यंत पोहोचू शकत नाही अशा ठिकाणच्या लाभार्थ्यांसाठी बँकिंग करस्पाँडंट मार्फत व्यवहारासाठी उपयुक्त.
- व्यवहारासाठी कोणतेही चार्जेस आकारले जात नाहीत.
- बँक खाते क्रमांक लक्षात ठेवण्याची आवश्यकता नाही.
- व्यक्ती-विशेष ओळख उपकरण बाळगणा-या व्यक्तींना संगणक,ॲन्ड्रॉईड मोबाईल फोन/टॅबलेटस् या व्दारे घरच्या घरी आर्थिक देवाण-घेवाणीचे व्यवहार करता येतील.

# यु.पी.आय.
# Unified Payments Interface



या प्रणालीचा उपयोग स्मार्टफोन व्दारे त्वरित इलेक्ट्रॉनिक पेमेंटस पाठविण्यासाठी होतो.इमिजिएट पेमेंट सर्व्हिस(**IMPS**)ची ही सुधारित आवृत्ती आहे जिचा वापर बँक खात्यामध्ये पैसे हस्तांतरणासाठी केला जात होता. यु.पी.आय.व्दारे कोणत्याही दिवशी कोणत्याही वेळी निधी हस्तांतरीत करता येतो.ही सुविधा भारत सरकार व रिझर्व बँक ऑफ इंडियाने देशातल्या २९ राष्टीयीकृत बँकांच्या सौजन्याने उपलब्ध करुन दिली आहे.




## यु.पी.आय. प्रणाली वापरण्यासाठी आवश्यकता

- कोणत्याही बँकेचे यु.पी.आय.ॲप्लीकेशन असलेला एखादा स्मार्टफोन.
- बँक खाते.
- सद्यस्थितीत एकूण २९ बँकांची यु.पी.आय. ॲप्लीकेशन उपलब्ध आहेत. उदा.स्टेट बँक पे, आय.डी.बी.आय. युपे,बँक ऑफ महाराष्ट्र महा यु.पी.आय.इ.

# यु.पी.आय.म्हणजे काय?
# Unified Payments Interface

●**UPI** (युनिफाईड पेमेंट इंटर फेस) म्हणजे स्मार्टफोनच्या माध्यमातून एका बँकेतून दुस-या बँकेत पैसे पाठविण्याची सोपी साधी पध्दत आहे. हि सुविधा भारत सरकार व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने भारतातल्या २९ राष्ट्रीयीकृत बँकांच्या सौजन्याने उपलब्ध करुन दिलेली आहे. या सुविधेखालील सर्व व्यवहार **NPCI**(नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया) च्या देखरेखी खाली चालतात.

●भारत सरकारने दिलेली **UPI** हि अशी सुविधा आहे जिच्याने कोणीही, कोणालाही पैसे देऊ आणी घेऊ शकतो.

● **UPI** चे सर्व व्यवहार हे मोफत असुन **UPI** ला एकदा का आपले **Credit** किंवा **Debit** कार्ड जोडून घेतले कि आपल्या बँकेच्या खात्यातून पैसे थेट समोरच्याच्या बँक खात्यात टाकू शकतो. म्हणजे मध्ये कुठल्या **Wallet** ची गरज नाही किंवा बँकेत पैसे येण्यासाठी कसलेही **commission** देण्याची गरज नाही.

# यु.पी.आय.म्हणजे काय?
# Unified Payments Interface

● **M wallet** आणी **UPI** मधला मूळ फरक आणी महत्त्वाचा फरक हा आहे कि, स्मार्टफोन वर असलेल्या कोणत्याही बँकेच्या **UPI** ॲप वरुन कोणत्याही बँकेच्या **UPI** ॲप वर पैसे पाठवता येतात, यामध्ये **M Wallet** सारखे त्याच कंपनीचे/बँकेचे ॲप वापरण्याचे बंधन नसते.

● **UPI** हि सुविधा सद्यस्थितीत भारतातल्या २९ बँकांमार्फत उपलब्ध आहे.सोप्या भाषेत सांगायचे तर या २९ बँका एकमेकांमधील आर्थिक व्यवहार **UPI** च्या माध्यमातून निशुल्क करण्याची सुविधा देतात.या सर्व बँकांचे **UPI** ॲप गुगल प्ले स्टोअर वर डाऊनलोड करणेसाठी उपलब्ध आहेत.

●यात आपण कोणत्याही बँकेचे खातेधारक असलो तरी देखील कोणत्याही बँकेचे **UPI** ॲप वापरु शकतो आणी कोणत्याही **UPI** ॲप ने कोणत्याही बँकेच्या खात्यावर पैसे टाकू/पाठवू शकतो.

# यु.पी.आय. देयक प्रणाली
# Unified Payments Interface

## यु.पी.आय.देयक प्रणालीव्दारे ऑनलाईन व्यवहार करणेसाठी तीन सोप्या पाय-या

**नोंदणी**

- कोणत्याही बँकेचे यु.पी.आय.ॲप डाऊनलोड करा.
- आपल्या खात्याच्या तपशिलासह नोंदणी करा आणी आपले नाव किंवा फोन क्रमांकासह व्हर्चुअल ओळख तयार करा उदा.तुमचे नाव@तुमच्या बँकेचे नाव किंवा तुमचा मोबाईल क्र.@तुमच्या बँकेचे नाव

**ऑनलाईन खरेदी**

- तुम्हाला खरेदी करावयाची वस्तु तुमच्या कार्टमध्ये ॲड करा.
- पेमेंट पर्यायातून यु.पी.आय.व्दारे पेमेंट हा पर्याय निवडा.
- आपला फक्त व्हर्चुअल आय.डी.व्यापा-याला दया.

**मोबाईल अधिकृती करण**

- ऑनलाईन खरेदीस संमती देण्याची विनंती करणारी एक पॉप-अप विंडो तुमच्या फोन ॲपवर प्राप्त होईल
- सुरक्षा पिन पुरवा.
- पेंमेंट यशस्वी झाल्याबाबता संदेश तुमच्या मोबाईल वर प्राप्त होईल.

# यु.पी.आय. देयक प्रणाली
# Unified Payments Interface

यु.पी.आय.देयक प्रणालीव्दारे ऑनलाईन व्यवहार करणेसाठी तीन सोप्या पध्दती

१.मोबाईल क्रमांकाने

२.VPI(व्हर्चुअल पेमेंट आय.डी.) ने

३.बॅंक खाते क्रमांकाने

**Send money** या पर्यायावर क्लिक केल्यावर हे तीनही पर्याय दिसतील.ज्याला पैसे पाठवावयाचे त्याचा मोबाईल क्रमांक **UPI** वर असेल तर मोबाईल क्रमांकावर किंवा समोरच्या कडे **VPI** असेल तर तो टाकून किंवा थेट बॅंक खात्याचा क्रमांक टाकून आणी **IFSC code** टाकून पैसे थेट समोरच्या व्यक्तीच्या खात्यात टाकता/पाठवता येतात. कमीत कमी १ रुपयापासून ते जास्तीत जास्त २ लाखापर्यंतची रक्कम **UPI** मधून पाठवता व स्विकारता येते.

# यु.पी.आय. देयक प्रणाली
# Unified Payments Interface

## VPI- (व्हर्चुअल पेमेंट आय.डी.)म्हणजे काय?

VPI हि एक गमतीशीर गोष्ट आहे.ज्यांना सारखा-सारखा बँक खाते क्रमांक सांगायचा कंटाळा येतो त्यांच्यासाठी VPI हि एक सहज आणी सोपी गोष्ट आहे. nitudip@gmail.com हा जसा माझा ई-मेल आय.डी.आहे व याचा जगात कोणीही पुनर्वापर करु शकत नाही, तसाच व्हर्चुअल पेमेंट आय.डी.हा एकदा ज्याचा झाला की पुन्हा दुस-या कोणालाही तो घेता येत नाही.म्हणजे nitudip@sbi या नावाने आता कोणालाही VPI मिळणार नाही.म्हणजे माझी ओळख ही माझीच राहील. हा VPI आपल्या बँक खात्याशी जोडला जातो म्हणजेच जेव्हा कोणीही nitudip@sbi या VPI वर पेमेंट करेल ते थेट माझ्या बँक खात्यात जमा होईल.हे एवढे सोपे आहे की ना IFSC CODE सांगायची गरज ना बँक खाते क्रमांक सांगायची गरज. यामुळे बँक खाते क्रमांकांचा अवैध वापर होणे बंद होते. हा देखील या सुविधेचा एक फायदा आहे.

# यु.पी.आय.देयक प्रणालीचे फायदे
# Unified Payments Interface

- यु.पी.आय.वापरणा-याचे नाव,बँक खाते क्रमांक,आय.एफ.एस.सी.कोड किंवा बँकेची शाखा ही माहिती पुरविण्याची आवश्यकता नाही.
- डेबिट कार्डसारख्या भौतिक साधनांचा वापरही यु.पी.आय.मुळे टाळला जातो.
- असुरक्षित रचनेमुळे ज्यामध्ये ऑनलाईन धोक्यांची शक्यता असणा-या नेट-बँकिंग सारख्या अनेक पाय-या असलेल्या प्रक्रिया करत बसण्याची आवश्यकता नाही.
- वापरासाठी अत्यंत सोपे ॲप्लिकेशन असल्याने कोणीही वापरु शकतो.
- त्वरित आणी सुरक्षित अधिकृतीकरण आणी हे कोठुनही करता येते.
- संपूर्णतः रोकडविरहित डिजिटल सुरक्षिततेचे मार्ग मोकळे होतात.
- पैशांची मागणी करणारी विनंती(उदा.एखादा ईनव्हाईस)पाठविण्यासाठी वापर करता येतो.
- अत्यावश्यक सेवांची देयके व शाळेची फी ऑनलाईन भरण्यासाठीही ग्राहक यु.पी.आय.चा वापर करु शकतात.

# ई-बटवा
# e – Wallet/Mobile Wallet




ई-वॉलेट म्हणजे इलेक्ट्रॉनिक बटवा.हे एक अशा प्रकारची प्रणाली आहे जीचा वापर संगणक किंवा स्मार्टफोनव्दारे ऑनलाईन व्यवहारांसाठी करता येतो.याचा वापर क्रेडिट किंवा डेबिट कार्डसारखाच असतो.निधी हस्तांतरण करण्यासाठी हे आपल्या बँक खात्याशी जोडणे आवश्यक असते. कागदविरहीत आर्थिक व्यवहार सुलभ करणे हा ई-बटव्याचा प्रमुख उद्देश आहे.

किराणा सामान,ऑनलाइन खरेदी,विमान/बस/ रेल्वे तिकिट खरेदीसाठी याचा वापर करता येऊ शकतो.

प्रिपेड खात्याचाच एक प्रकार,ज्यामध्ये भविष्यातील ऑनलाईन व्यवहारासाठी वापर करणारा आपले पैसे सुरक्षित ठेऊ शकतो.

संकेतांकाव्दारे (पीन) व्दारे सुरक्षित




# ई-बटवा
# e-Wallet/Mobile Wallet

## ई-बटवा वापराची पध्दत – ग्राहकासाठी

- तुमच्या मोबाईलवरती ई-वॉलेट हे ॲप डाऊनलोड करुन घ्या.
- योग्य ती माहिती पुरवून साईन अप करा.वापर करणा-याला एक सांकेतांक प्राप्त होईल.
- डेबिट/क्रेडिट कार्ड किंवा नेटबँकिंगचा वापर करुन आवश्यक रक्कम भरुन घ्या.
- ऑनलाईन शॉपिंग झाल्यावर तुमचे ई-वॉलेट आपोआपच वापर करणा-याची माहिती पेमेंट फॉर्मवर भरेल.
- एकदा का ऑनलाईन पेमेंट करुन झाले की मग वापर करणा-याला इतर कोणत्याही संकेतस्थळावर ऑर्डर फॉर्म भरण्याची आवश्यकता नाही.




# ई-बटवा
# e-Wallet

## ई-बटवा वापराची पध्दत – व्यापा-यांसाठी

- तुमच्या मोबाईलवरती ई-वॉलेट हे ॲप डाऊनलोड करुन घ्या.
- योग्य ती माहिती पुरवून साईन अप करा.वापर करणा-याला एक सांकेतांक प्राप्त होईल.
- व्यापारी असल्याचे स्वत: जाहीर करा.
- पेमेंटस् (निधी हस्तांतरण) स्विकारणे सुरु करा.

## ई-वॉलेटचा वापर करण्यासाठी आवश्यक बाबी

- बँक खाते
- स्मार्ट फोन
- २जी/३जी/४जी इंटरनेट सुविधा
- कोणत्याही बँकेचे मोफत ई-वॉलेट ॲप

# डिजीटल आर्थिक व्यवहार करताना घ्यावयाची दक्षता

- तुमच्या प्रत्येक ऑनलाईन व्यवहाराची माहिती एस.एम.एस.(लघु संदेश सुविधा) च्या माध्यमातुन मिळण्यासाठी तुमच्या मोबाईल क्रमांकाची बँकेमध्ये नोंदणी करा. हा मोबाईल क्रमांक तुमचेच नावे मोबाईल सेवा पुरविणा-या कंम्पनीने दिला असणे अत्यंत आवश्यक आहे.
- तुमच्या पिनबाबत गोपनियता बाळगा,तो कोणालाही सांगू नका अथवा कोणतेही ठिकाणी दर्शनी स्वरुपात लिहून ठेऊ नका.
- फक्त विश्वासू/प्रसिध्द व्यापा-यांशीच व्यवहार करा.
- ए.टी.एम.मध्ये असताना तुमच्या खांदयावरुन वाकून इतर कोणीही तुमचा बँक व्यवहार पहात नाही ना याची खात्री करा.
- डेबिट/क्रेडिट कार्ड गहाळ झाल्यास याबाबतची माहिती बँकेस त्वरित देऊन सदरचे कार्ड तात्काळ ब्लॉक(बंद)करावे. बँकेकडील ॲप वापरुन ही प्रक्रिया तुम्हालासुध्दा एस.एम.एस.व्दारे किंवा फोनव्दारेही करता येते.







# धन्यवाद!